महाराष्ट्र शासन

क्रमांक : अशैसं-२०१२/ प्र.क्र. ०२१/का-५
अल्पसंख्यांक विकास विभाग.
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक- १५.०५.२०१४

प्रति,
अध्यक्ष/सचिव,
सोमैया विद्याविहार ट्रस्ट,
४५/४७, फजलभाई बिल्डींग,
एम.जी. रोड, फोर्ट, मुंबई.

विषय :- शासन निर्णय अल्पसंख्याक विकास विभाग- अशैसं-२०१२/प्र.क्र २१/का-५, दि. २७.०५.२०१३ बाबत.

संदर्भ :- आपले दि. २७.०३.२०१४ चे पत्र

महोदय,

महाराष्ट्र राज्यातील अल्पसंख्याकडून चालविण्यात येणाऱ्या शैक्षणिक संस्थाना धार्मिक/भाषिक अल्पसंख्याक दर्जा देण्यासाठी अटी व शर्ती तसेच ऑनलाईन अर्जा बाबतची कार्यपध्दती शासन निर्णय अल्पसंख्याक विकास विभाग- अशैसं-२०१२/प्र.क्र २१/का-५, दि. २७.०५.२०१३ अन्वये विहित करण्यात आली आहे. उपरोक्त शासन निर्णयातील भाग (अ) (iv) अन्वये अल्पसंख्याक संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या उच्च तांत्रिक अथवा व्यवसायिक शैक्षणिक संस्था अल्पसंख्याकांना प्रवेश देण्याबाबतच्या तरतुदी देण्यात आल्या आहेत.

आपल्या संदर्भाधिन पत्रान्वये शासन निर्णय दि. २७.०५.२०१३ मधिल भाग भाग (अ) (iv) मध्ये सुधारणा करण्याबाबतचे आपले पत्र प्राप्त झाले. उपरोक्त पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, आपल्या शैक्षणिक संस्थेस शासनाने गुजराती (भाषिक) अल्पसंख्याक दर्जा मान्यता प्रदान केला आहे. आपल्या संस्थेने अल्पसंख्याक कोट्यातील ५१% जागांवर प्रथम गुजराती (भाषिक) अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत. जर गुजराती (भाषिक) अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थी उपलब्ध झाले नाही तर उर्दु, हिंदी, कन्नड,बंगाली, तेलगु,तामीळ, ओरीया इ. इतर भाषिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा.

यानंतर जर जागा रिक्त राहिल्यास शासनाने घोषित केलेल्या धार्मिक अल्पसंख्याक उदा. मुस्लिम, ख्रिश्चन, जैन, पारशी, शीख व बौध्द या धार्मिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा. याबाबतची प्रसिध्दी जाहिरातीद्वारे प्रवेशप्रक्रियाच्या सुरवातीला संकेतस्थळावर तसेच वृत्तपत्रात देण्यात यावी व इच्छुक भाषिक तसेच धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात यावेत व वरील प्रमाणे गुणवत्ता यादी तयार करुन आपल्या संकेतस्थळावर प्रसिध्दी करावी व पारदर्शक पध्दतीने नियमानुसार प्रवेश देण्यात यावेत. त्यानंतरही आपल्या संस्थेतील अल्पसंख्याक कोट्यातील जागा रिक्त राहील्यास शासन निर्णय अल्पसंख्याक विकास विभाग- अशैसं-२०१२/प्र.क्र २१/का-५, दि. २७.०५.२०१३ नुसार शासन मान्यतेने भरण्यात याव्यात.

आपली,

(अैनुल अत्तार)
सह सचिव, महाराष्ट्र शासन